# MPSC

# प्रचलित घडामोडी

## स्पेशल कोर्स (मराठी)




Headlines: १३ ते २६ जानेवारी २०२०

२७ जानेवारी २०२०

# हेडलाईन्स

## दावोस परिषद

- जागतिक पातळीवरील आर्थिक जगात विशेष महत्त्व असलेली दावोस परिषद (वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम) स्वित्झर्लंडमधील दावोस या ठिकाणी पार पडली.
- आल्प्स पर्वतातील दावोस या ठिकाणी या परिषदेचे आयोजन केले जाते.

**दावोस परिषदेविषयी :**

**उद्दिष्ट :** जगातील आर्थिक समस्यांबरोबरच राजकीय, पर्यावरणविषयक तसेच इतर समस्यांवर विचारविनिमय करणे, जागतिक राजकारणातील आर्थिक बाबींविषयी चर्चा करण्यासाठीचा तटस्थ मंच अशी या परिषदेची ओळख आहे.

- 1971 सालापासून दरवर्षी दावोस येथे ही जागतिक आर्थिक परिषद भरवली जाते.
- 1987 पर्यंत या परिषदेला युरोपीय मॅनेजमेंट फोरम या नावाने ओळखले जात होते.
- ही एक बिगर शासकीय संघटना आहे.
- दावोस परिषदेला 2012 मध्ये युनेस्कोमध्ये निरीक्षकाचा दर्जा मिळाला होता.
- राजकीय नेत्यांच्या दृष्टीने हे एक आंतरराष्ट्रीय स्तरावरचे तटस्थ व्यासपीठ आहे.

**दावोस परिषदेची आतापर्यंतची कामगिरी :**

- 1988 मध्ये ग्रीस व तुर्की या दोन देशांतील युद्ध टाळण्याचा यशस्वी प्रयत्न.
- 1994 मध्ये इस्रायल व पॅलेस्टाईनमध्ये तह घडवून आणला.

## एकातेरिनो ग्रीसच्या पहिल्या महिला राष्ट्रपती

- ग्रीसच्या इतिहासात पहिल्यांदाच राष्ट्रपतीपदी एका महिलेची निवड केली गेली आहे.
- त्या कौन्सिल ऑफ स्टेट ऑफ ग्रीसच्या पहिल्या महिला प्रमुख व ग्रीसच्या कमांडर इन चीफ असणार आहेत.

**ग्रीसविषयी :**

- ग्रीसला युनान असेही संबोधले जाते.
- दक्षिण युरोपातील भूमध्य समुद्राच्या किनाऱ्यावरील देश.
- भौगोलिक दृष्ट्या ग्रीस हा बाल्कन द्वीपकल्पाचा दक्षिण टोकाचा भाग आहे.
- सर्वोच्च शिखर – ऑलिंपस पर्वत (2917 मी.)
- राजधानी – अथेन्स
- अधिकृत भाषा – ग्रीक
- राष्ट्रीय चलन – युरो
- स्वातंत्र्य दिवस – 25 मार्च 1821. (ऑटोमन साम्राज्य पासून स्वातंत्र्य मिळाले.)
- ब्रीद वाक्य – स्वातंत्र्य किंवा मरण
- ऑलिंपिक खेळ, लोकशाही यांची जन्मभूमी असलेला देश.
- ग्रीस हा युरोपमधील पहिला देश आहे जिथे मानवी सभ्य संस्कृतीची सुरुवात झाली.

## भारताचा 'सेसेमिक हझार्ड मायक्रोझोनेशन प्रोजेक्ट'

- भारत सरकारच्या भू-शास्त्र मंत्रालयाने आवश्यक त्या उपाययोजना करून भूकंपामुळे येणाऱ्या आपत्तींना कमी करण्यासाठी देशभरात 'सेसेमिक हझार्ड मायक्रोझोनेशन प्रोजेक्ट' नावाचा प्रकल्प राबवत आहे.
- 'सेसेमिक हझार्ड मायक्रोझोनेशन' म्हणजे काय?
- 'सेसेमिक हझार्ड मायक्रोझोनेशन' ही भूगर्भीय आणि भूभौतिकीय वैशिष्ट्यांच्या आधारे भूकंप-प्रवण क्षेत्र ओळखण्याची एक प्रक्रिया आहे.

**या प्रक्रियेत खालील बाबी गृहीत धरल्या जातात:**

1. धरणीकंप
2. दरडी कोसळणे.
3. मातीच्या थरांचा प्रतिसाद
4. लिक्विफॅक्शन ससेप्टिबिलिटी
5. पर्वत कोसळण्याचा धोका
6. भूकंपामुळे येणारा पूर

- आतापर्यंत ही प्रक्रिया सिक्किम, दिल्ली, कोलकाता, बेंगळूरू, गुवाहाटी, जबलपूर, देहरादून, अहमदाबाद आणि गांधीधाम या शहरांमध्ये पूर्ण झालेली आहे.
- जगापुढे जापान हे एक आदर्श उदाहरण आहे जिथे मायक्रोझोनेशन तंत्र चांगल्या प्रकारे अंमलात आणले

गेले आहे.

## राष्ट्रीय गंगा अभियानाच्या अंतर्गत पाणथळ प्रदेशांचे संवर्धन

- राष्ट्रीय गंगा अभियानाच्या अंतर्गत पाणथळ प्रदेशांचे संवर्धन
- 'नमामि गंगे' कार्यक्रमाच्या अंतर्गत राष्ट्रीय स्वच्छ गंगा अभियान (NMCG) यांनी गंगा नदीच्या खोऱ्यात येणाऱ्या' पाणथळ प्रदेशांचे संवर्धन करण्यासाठी पुढाकार घेतला आहे.

**प्रकल्पाविषयी**

- प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात उत्तराखंड, उत्तरप्रदेश, बिहार, झारखंड आणि पश्चिम बंगालमधल्या पाणथळ प्रदेशांवर लक्ष केंद्रित केले जाणार आहे.
- NMCG संस्था राज्य पाणथळ प्रदेश प्राधिकरण या संस्थांच्या सहकार्याने अशा प्रदेशांची निवड करेल त्यांच्या संवर्धनासाठी आणि व्यवस्थापनासाठी एकात्मिक व्यवस्थापन योजना तयार केली जाणार आहे.

**पाणथळ प्रदेश म्हणजे काय?**

- पाणथळ प्रदेश हा समुद्र किंवा जमिनीजवळ असतो तसेच तो हंगामीही असू शकतो. त्या प्रदेशात वर्षातले काही महिने किंवा बारमाही पाणी भरलेले असते.
- पाणथळ प्रदेश पर्यावरणात एक महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. उदा. पुराचे पाणी सामावून घेणे, माशांना पाण्यातील वनस्पती खाद्य म्हणून पुरवणे, प्राण्यांना निवारा देणे, तळाशी जमणारा गाळ काढून पाणी शुद्ध करणे.
- नदीच्या पाण्याचा प्रवाह वाढविणे आणि जलस्रोतांचे पुनर्भरण करणे यासाठी पाणथळ प्रदेशांचे संवर्धन करणे आवश्यक आहे, कारण हे प्रदेश जमिनीतल्या पाण्याची पातळी वाढवते आणि नदीचा प्रवाह कायम राखण्यास मदत होते.

**1971 ची रामसार परिषद**

- 1971 साली इराण मधील रामसार येथे झालेल्या रामसार परिषदेत 'पाणथळ प्रदेशांच्या संवर्धनार्थ रामसर करारनामा' मंजूर करण्यात आला.

## भारताच्या उज्ज्वला योजनेचे प्रतिरूप घाना देश साकारणार

- आफ्रिका खंडातील घाना हा देश भारत सरकारची उज्ज्वला योजना याचा संदर्भ घेऊन तशीच योजना देशात राबवविणार आहे. घराघरात स्वयंपाकाचा गॅस पोहोचविण्यात भारताने प्राप्त केलेल्या यशाला पाहता घाना सरकारने ही योजना राबविण्यासाठी भारतीय तज्ज्ञांची मागणी केली आहे.
- त्यासंदर्भात 22 जानेवारी 2020 रोजी दोन्ही देशांमध्ये करार झाला आहे.
- घानाने स्वयंपाकाचा गॅस पोहोचविण्याच्या बाबतीत असलेली सध्याची 23 टक्के ही टक्केवारी 2030 सालापर्यंत कमीतकमी 50 टक्क्यांवर नेण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.

**उज्ज्वला योजनेविषयी :**

- 2016 सालापासून राबविण्यात येत असलेल्या उज्ज्वला योजनेच्या अंतर्गत, प्रत्येक गॅस जोडणीमागे 1600 रुपयांच्या आर्थिक मदतीने दारिद्र्यरेषेखालील (BPL) कुटुंबांला गॅस जोडणी दिली जाते.
- LPG जोडणी कुटुंबातल्या महिला सदस्याच्या नावावर दिली जाते. ही पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालयाकडून राबवली जात असलेली कल्याणकारी योजना आहे.
- योजनेच्या अंतर्गत एका वर्षात सरासरी तीन सिलेंडर वितरित केले जातात आणि राष्ट्रीय सरासरी सात सिलेंडर आहेत.

**घाना देश**

- घाना हा पश्चिम आफ्रिकेतील देश आहे.
- राजधानी : आक्रा
- राष्ट्रीय चलन : घाना सेडी
- घानाच्या पश्चिमेला कोट दि आईव्होर, उत्तरेला बर्किना फासो व पूर्वेला टोगो हे देश तर दक्षिणेला गिनीचे आखात आहे.
- 1874 साली ब्रिटिशांनी या प्रदेशात वसाहत स्थापन केली व येथल्या सोन्याच्या मुबलक साठ्यांमुळे ह्याचे नाव गोल्ड कोस्ट असे ठेवले. 1957 साली स्वातंत्र्य मिळून घाना देशाची निर्मिती झाली.
- आफ्रिका खंडात सुवर्ण उत्पादनात दक्षिण आफ्रिकेच्या खालोखाल घानाचा दुसरा क्रमांक लागतो. कोकोच्या

उत्पादनात देखील घाना जगात अग्रेसर आहे.

## महामार्ग कामांवर लक्ष ठेवण्यासाठी 'गती'

- देशभरातील महामार्ग प्रकल्पांच्या कामांवर लक्ष ठेवण्यासाठी 'गती' हे मोबाईल ॲप राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाद्वारे तयार केले गेले आहे.
- या ॲपच्या माध्यमातून सर्व अधिकारी आणि कंत्राटदार जोडण्यात आले आहेत. त्यामुळे सर्व प्रकल्पांचे निरीक्षण करता येऊ शकते.

**महत्त्वाचे :**

- भारतातील सर्व प्रकारच्या रस्त्यांची एकूण लांबी : सुमारे 47 लाख किमी.
- देशातील एकूण प्रवासी वाहतूकीपैकी 80% प्रवासी वाहतूक व एकूण मालवाहतुकीपैकी 65% मालवाहतूक रस्त्यांच्या माध्यमातून होते.
- भारतात रस्त्यांची घनता- दर 100 चौ.किमी

**रस्त्यांची घनता सर्वाधिक असणारी राज्ये –**

केरळ, आसाम, गोवा, ओडिशा, तमिळनाडू

**रस्त्यांची घनता कमी असणारी राज्ये –**

हिमाचल प्रदेश, मणिपूर, मेघालय, मध्य प्रदेश, सिक्किम, जम्मू काश्मीर.

- राष्ट्रीय महामार्ग हा विषय केंद्राच्या अखत्यारीत येतो.

**भारतातील सर्वाधिक लांबीचे राष्ट्रीय महामार्ग :**

1) NH 7 : लांबी – सुमारे 2370 किमी. भारतातील सर्वाधिक लांबीचा राष्ट्रीय महामार्ग. वाराणसी ते कन्याकुमारी. हा महामार्ग 7 राज्यांतून जातो.

2) NH 6 : लांबी - 1949 किमी. हाजिरा ते कोलकाता. हा महामार्ग 6 राज्यांतून जातो. महाराष्ट्रातील सर्वाधिक लांबीचा राष्ट्रीय महामार्ग

3) NH 5 : लांबी 1530 किमी. बहारगोरा ते चेन्नई

## भारताच्या लोकशाही निर्देशांकात घसरण

- द इकॉनॉमिस्ट या साप्ताहिकाच्या लोकशाही निर्देशांकानुसार (Democracy Index) भारताचा 2019 साली 51 वा क्रमांक आहे.
- 2018 मध्ये भारत या यादीत 41 व्या स्थानी होता. (2018 च्या तुलनेत दहा स्थानांनी भारताची घसरण)
- द इकॉनॉमिस्ट हे लंडनस्थित एक साप्ताहिक आहे. यांच्यातर्फे 2006 सालापासून लोकशाही निर्देशांक जाहीर केला जातो.
- निवडणूक प्रक्रिया, बहुसंख्यांची स्थिती, सरकारी कार्यप्रणाली, राजनीतिक भागीदारी, राजकीय संस्कृती, सामाजिक स्वातंत्र्य या घटकांवर आधारित हा लोकशाही निर्देशांक जाहीर केला जातो.

**निर्देशांकानुसार पहिले पाच देश :**

1) नॉर्वे
2) आइसलँड
3) स्वीडन
4) न्यूझीलँड
5) फिनलँड

**निर्देशांकानुसार तळातील देश**

1) चाड
2) सीरिया
3) मध्यआफ्रिका प्रजासत्ताक

## भ्रष्टाचार निर्देशांक 2019

- Corruption Perception Index
- ट्रान्सपरन्सी इंटरनॅशनल या संस्थेने 2019 चा भ्रष्टाचार निर्देशांक जाहीर केला.
- या यादीत भारताचा 180 देशांत 41 गुणांसह 80 वा क्रमांक आहे.
- 2018 साली भारताचा या यादीत 78 वा क्रमांक होता.

**यादीनुसार क्रमवारी (कमी पासून जास्त भ्रष्टाचारी देश )**

1) डेन्मार्क आणि न्यूझीलँड
2) फिनलँड
3) सिंगापूर
4) स्वीडन
5) स्वित्झर्लंड
80) भारत, चीन
120) पाकिस्तान

- सर्वात कमी भ्रष्टाचार – डेन्मार्क
- सर्वाधिक भ्रष्टाचार – सोमालिया

**महत्त्वाचे :**

- 9 डिसेंबर – आंतरराष्ट्रीय भ्रष्टाचारविरोधी दिन किंवा लाचलुचपत प्रतिबंधक दिन.
- 2019 ची संकल्पना – United against

corruption for development peace and security.

- जगभरात प्रत्येक वर्षी अंदाजे 2.7 लाख कोटी डॉलरचा भ्रष्ट व्यवहार होतो. ही रक्कम जागतिक सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या 5 टक्क्यांपेक्षा अधिक आहे.
- भारतीय दंड संहिता (IPC) कलम 161 मध्ये भ्रष्टाचारासाठीची तरतूद आहे.
- 1988 मध्ये भारतात भ्रष्टाचार विरोधी कायदा संमत झाला.
- 2013 मध्ये संसदेत भ्रष्टाचारास पायबंद घालणारे 'लोकपाल बिल' मंजूर झाले.
- भारताचे पहिले लोकपाल –पिनाकी घोष

## झारखंड मधील झारिया सर्वात प्रदूषित शहर

- झारखंड मधील कोळसा खाणींचा उद्योग असलेले झारिया हे भारतातील सर्वात प्रदूषित शहर असल्याचे स्पष्ट झाले असून दिल्लीचा दहावा क्रमांक लागला आहे. दिल्ली 2018 मध्ये 8व्या स्थानावर होते.
- देशातील 287 शहरांपैकी 231 शहरे सर्वात प्रदूषित असल्याचे ग्रीनपीस अहवालात म्हटले आहे.
- झारखंडमधील धनबाद हे ठिकाण कोळसा खाणी व उद्योगांसाठी प्रसिद्ध असून ते देशातील दुसऱ्या स्थानावरील प्रदूषित शहर आहे. PM 10 कणांचे प्रमाण देशातील 287 शहरांत मोजण्यात आले आहे. मिझोराममधील लुंग्लेई हे ठिकाण सर्वात कमी प्रदूषित असून त्या खालोखाल मेघालयमधील डोवकी या ठिकाणाचा दुसरा क्रमांक लागला आहे.
- देशातील सर्वांत प्रदूषित शहरांपैकी 10 उत्तर प्रदेशात असून त्यात नोएडा, गाझियाबाद, बरेली, अलाहाबाद, मोरादाबाद, फिरोजाबाद यांचा समावेश आहे. दक्षिणेकडे एकूण 28 ठिकाणांचा समावेश असेल तरी त्यात केरळ मधील एकाही शहराचा समावेश नाही.
- ग्रीनपीस भारतीय शाखेने एरोपोकल्स 4 अहवाल जारी केला असून त्यात शहरांच्या हवाप्रदूषणाचा ताळेबंद मांडला आहे.
- 2018 मध्ये देशातील एकूण 287 शहरांच्या हवेचे 52 दिवस निरीक्षण करून असे सांगण्यात आले की, 231 शहरांत PM 10 कणांचे प्रमाण हे धोकादायक पातळीपेक्षा अधिक आहे.
- (PM10 : 10 मायक्रोमीटरपेक्षा लहान आकाराचे धूलिकण, जे श्वसनामार्फत शरीरात जाऊ शकतात.)

## कोरोना विषाणू

- सध्या चीनमध्ये कोरोना विषाणूचा प्रसार झपाट्याने होत आहे. चीनमध्ये हा नवीन कोरोना विषाणू पहिल्यांदा चीनमधील वुहान शहरात दिसून आला, म्हणून याला 'वुहान विषाणू' या नावाने सुद्धा ओळखले जाते.
- विषाणू एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीस संक्रमित होत असल्याने त्याचा धोका अधिक वाढला आहे.
- 17 जुलै 2019 रोजी थायलंडमध्ये कोरोना विषाणूच्या संसर्गाचा पहिला रोगी समोर आला. त्यानंतर जपानमध्ये कोरोना विषाणूची प्रकरणे समोर आली होती.
- या विषाणूमुळे सिव्हियर ॲक्यूट रेस्पिरेटरी सिंड्रोम (सार्स) हा रोग होतो.
- जागतिक आरोग्य संघटनेच्या मते कोरोना विषाणूचा संसर्ग समुद्री अन्न बाजाराशी संबंधित आहे.
- कोरोना विषाणूमुळे पसरणाऱ्या आजाराला 'जागतिक आरोग्य आणीबाणी' घोषित करावी का यावर चर्चा करण्यासाठी जागतिक आरोग्य संघटनेने एक बैठक बोलावली आहे.

**भारतातील प्रसार**

- या विषाणूचा प्रसार मुख्यत्वे समुद्री अन्नातून होत असल्याने भारतात हा विषाणू पसरण्याची शक्यता खूपच कमी आहे. कारण भारत फारच कमी प्रमाणात समुद्री अन्नाची आयात करतो.
- समुद्री उत्पादने निर्यात विकास प्राधिकरणाच्या (MPEDA) अहवालानुसार 2018 मध्ये भारताने 6923 दशलक्ष डॉलर्स किमतीच्या समुद्री अन्नाची (प्रामुख्याने मासे) निर्यात केली होती. तर केवळ 138 दशलक्ष डॉलर्स किमतीचे समुद्री अन्न आयात केले होते.
- जपान, अमेरिका, हाँगकाँग व कोरियासारखे देश चीनकडून मोठ्या प्रमाणात सागरी अन्नाची आयात करतात.

**भारतातील उपाय योजना**

- या विषाणूपासून सुरक्षित राहण्यासाठी भारतात चीनहून आलेल्या लोकांची सखोल चाचणी करण्यात येत आहे.

- नागरी उड्डाण मंत्रालयाने राजधानी दिल्लीसह मुंबई, चेन्नई, बेंगळूरू, हैदराबाद, कोची व कोलकाता विमानतळांवर थर्मल स्क्रीनची व्यवस्था केली आहे.
- आरोग्य मंत्रालयानेही या विषाणूपासून बचाव व पाळत ठेवण्याबाबत मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली आहेत.

**कोरोना विषाणू नेमका आहे तरी काय?**

- हा विषाणूच्या अनेक प्रकारांपैकी केवळ 6 प्रकारच्या विषाणूंची माणसाला बाधा होऊ शकते.
- नव्या विषाणूचा शोध लागल्यानंतर संक्रमित होणाऱ्या कोरोना विषाणूची संख्या आता 7 झाली आहे.
- नव्या कोरोना विषाणूच्या जेनेटिक कोडचे विश्लेषण करण्यात आले.
- या विषाणूचा एक प्रकार म्हणजे सार्स आहे. हा नवा विषाणूसार्सच्या जवळचा असावा असे संशोधकांचे मत आहे
- सार्स प्रकारातला कोरोना विषाणू अत्यंत घातक मानला जातो.
- 2002 साली चीनमध्ये 8098 लोकांना सार्स विषाणूचा संसर्ग झाला होता. त्यापैकी 774 लोकांचा मृत्यू झाला होता.
- डोकेदुखी, नाक गळणे, खोकला, घसा खवखवणे, ताप येणे, अस्वस्थ वाटणे, शिंका येणे, धाप लागणे, थकवा जाणवणे, न्यूमोनिया फुफ्फुसात सुज इ. कोरोनाच्या संसर्गाची लक्षणे आहेत.
- या विषाणूची लागण झालेल्या रुग्णांमध्ये साधारणपणे सर्दी, खोकला अशी लक्षणे दिसतात मात्र लागण गंभीर असेल तर मृत्यूही ओढवू शकतो.
- सार्स विषाणू मांजरातून माणसात आला आहे.
- या नव्या विषाणूचा मूळ स्रोत कोणता आहे याची अधिकृत माहिती चीनने दिलेली नाही.
- या विषाणूविषयी चिंता वाटण्याचे सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे या विषाणूमुळे सर्वात आधी फुफ्फुसावर परिणाम होतो.

## अरुण जेटली, सुषमा स्वराज, जॉर्ज फर्नांडिस यांना मरणोत्तर पद्मविभूषण

- भारतरत्न पुरस्कारानंतर प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या पद्म पुरस्काराची प्रजासत्ताक दिनाच्या काही तास आधी घोषणा करण्यात आली.
- भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली, माजी परराष्ट्रमंत्री सुषमा स्वराज, माजी संरक्षणमंत्री जॉर्ज फर्नांडिस यांना मरणोत्तर पद्मविभूषण पुरस्कार जाहीर झाला आहे.
- क्रीडा क्षेत्रात भरीव कामगिरी करणाऱ्या खासदार मेरी कोम, छन्नुलाल मिश्रा, अनेरूद जुगुनाथ जीसीएसके, विश्वतीर्थ स्वामीजी पेजवरा अधोखाजा मठ-उडुपी यांनाही पद्मविभूषण पुरस्कार जाहीर झाला आहे.
- पद्मविभूषण, पद्मभूषण आणि पद्मश्री पुरस्काराने गौरविण्यात येणाऱ्या मान्यवरांच्या नावाची केंद्र सरकारच्या वतीने घोषणा करण्यात आली. यात राजकारण, कला, क्रीडा, सामाजिक कार्य आदी क्षेत्रात काम करणाऱ्या देशविदेशातील 141 मान्यवरांचा पद्म पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार आहे.
- माजी संरक्षणमंत्री मनोहर पर्रीकर यांना मरणोत्तर पद्मभूषण पुरस्कार जाहीर झाला आहे.

**इतर पद्मभूषण पुरस्कारार्थी:**

- मुमताज अली (आध्यात्मिक क्षेत्रातील कार्यासाठी)
- सय्यद मुझीम अली (मरणोत्तर)
- निळकांता रामकृष्णा माधवा मेनन (मरणोत्तर)
- अजोय चक्रवर्ती (कला क्षेत्रातील कार्यासाठी)
- मुझफ्फर हुसेन बेग
- मनोज दास
- बालकृष्ण दोशी
- कृष्णम्मल जगन्नाथन
- एस. सी. जमीर
- अनिल प्रकाश जोशी
- बॅटमिंटनपटू पी.व्ही. सिंधू
- वेणू श्रीनिवासन

**महाराष्ट्रातील या मान्यवरांचा गौरव :**

- पद्म पुरस्कारांमध्ये महाराष्ट्रातील मान्यवरांचाही गौरव करण्यात येणार आहे. यात उद्योगपती आनंद महिंद्रा यांना पद्मभूषण पुरस्कार जाहीर झाला आहे.

**पद्मश्री पुरस्कारार्थी :**

- झहीर खान
- डॉ. रमण गंगाखेडकर
- करण जोहर
- सरिता जोशी

- पोपटराव पवार (आदर्श गाव योजनेचे प्रणेते)
- एकता कपूर
- बीजमाता राहीबाई पोपेरे
- कंगना राणौत
- अदनान सामी
- सय्यद मेहमूद शाह कादरी उर्फ सय्यदभाई (सामाजिक कार्यकर्ते)
- साँड्रा डिसूझा
- सुरेश वाडकर

## खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धा

- महाराष्ट्राच्या खेळाडूंनी केलेल्या अप्रतिम कामगिरीमुळे 'खेलो इंडिया' युवा क्रीडा स्पर्धेत सलग दुसऱ्यांदा सर्वसाधारण विजेतेपद मिळवण्याचा मान महाराष्ट्राने पटकावला.
- नवीनचंद्र बाडरेली स्टेडियममध्ये झालेल्या समारोप सोहळ्यात महाराष्ट्राच्या संघाला सर्वसाधारण विजेतेपदाचा चषक प्रदान करण्यात आला.
- महाराष्ट्राने यंदा 20 क्रीडाप्रकारांपैकी 19 खेळांमध्ये सहभाग नोंदवला होता.
- त्यापैकी जलतरणात सर्वाधिक 46 पदकांची कमाई महाराष्ट्राच्या खेळाडूंनी केली.
- जिम्नॅस्टिक्समध्ये 40, कुस्तीमध्ये 31, ॲथलेटिक्समध्ये 29 आणि वेटलिफ्टिंगमध्ये 25 पदके मिळवत महाराष्ट्राने आपला दबदबा कायम राखला.

**महाराष्ट्राची एकूण 256 पदके :**

सुवर्ण : 78, रौप्य : 77, ब्राँझ : 101

**हरियाणाची एकूण 200 पदक :**

सुवर्ण : 68, रौप्य : 60, ब्राँझ : 72

**दिल्लीची एकूण 122 पदके :**

सुवर्ण : 39, रौप्य : 36, ब्राँझ : 47

## 24 जानेवारी : राष्ट्रीय बालिका दिन

- भारत दरवर्षी 24 जानेवारीला राष्ट्रीय बालिका दिन साजरा करतो.
- याची सुरुवात महिला व बाल विकास मंत्रालयाने 2008 मध्ये केली होती.
- या दिवसाचे उद्दिष्ट : म्हणजे देशातील मुलींना भेडसावणाऱ्या असमानतेबाबत जनजागृती करणे. हे मुलींना त्यांच्या हक्कांबद्दल जागरूक करणे. तसेच यामुळे बालिकेचे आरोग्य, शिक्षण आणि पोषण यांचे महत्त्व वाढते.
- दरवर्षी 11 ऑक्टोबर रोजी मुलीचा आंतरराष्ट्रीय दिवस साजरा केला जातो.
- CRY (चाईल्ड राइट्स अँड यू)च्या मते भारतात जगातील एक तृतीयांशपेक्षा जास्त बालवधूंचे घर आहे. येथे 10 दशलक्षाहून अधिक बालवधू आहेत.